**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**

**जावक क्र: व.वि.श.म./          /          /२५-२६**
**दिनांक : 18/08/2025**

# वसई विरार शहर महानगरपालिका

अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर आवश्यक त्या सर्व उपाययोजना करा – आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी यांचे अधिकाऱ्यांना आदेश

भारतीय हवामान विभागाच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्याकडून पालघर जिल्हात दि.२१ ऑगस्ट २०२५ पर्यंत अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. वसई विरार महानगरपालिका क्षेत्रातही जोरदार पाऊस सुरु असून अतिवृष्टीमुळे महानगरपालिका क्षेत्रातील काही सखल भागांमध्ये पावसाचे पाणी साचले आहे. या पार्श्वभूमीवर आज पालिकेचे मा.आयुक्त श्री. मनोजकुमार सूर्यवंशी यांनी महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी पाहणी करून आवश्यक त्या उपाययोजना करणेच्या सूचना पालिका अधिकारी व कर्मचारी यांना दिल्या. या पाहणीवेळी मा.अतिरिक्त आयुक्त श्री. संजय हेरवाडे, मा.अतिरिक्त आयुक्त श्री.दिपक सावंत व इतर मनपा अधिकारी उपस्थित होते.

गेले दोन दिवस महानगरपालिका क्षेत्रात सुरु असलेल्या जोरदार पावसामुळे सखल भागात साचलेले पाणी काढण्यासाठी महानगरपालिकेमार्फत विविध ठिकाणी संक्शन पंप लावण्यात आले आहेत. महानगरपालिकेकडील ५४ संक्शन पंपांचा आवश्यकतेप्रमाणे वापर सुरु असून पावसाचे पाणी साचून कोणताही अडथळा निर्माण होणार नाही यासाठी तेथे २४×७ कर्मचारी उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे उन्मळून पडलेली झाडे तात्काळ हटविणे, कचरा अडकून बंद झालेली गटारे, रस्त्यावरील मॅनहोल तात्काळ स्वच्छ करून पाण्याचा निचरा सुयोग्यरित्या करणे, परिसर स्वच्छ राहील याबाबत उपाययोजना करून जंतुनाशक फवारणी वेळोवेळी करणे, तसेच पावसाळ्यात आरोग्य समस्या उद्भवण्याची शक्यता लक्षात घेता मनपाची वैद्यकीय आरोग्य यंत्रणा तत्पर ठेवणे, पाणीपुरवठा सुरळीत ठेवणे व पिण्याच्या पाण्याचे निर्जंतुकीकरण वेळोवेळी करणे इ. विविध सूचना मा.आयुक्त महोदयांनी यावेळी सर्व संबंधित विभागांना दिल्या. तसेच यापूर्वीच महानगरपालिकेमार्फत पावसाळ्यात दरड प्रवण क्षेत्राच्या ठिकाणच्या नागरिकांना तात्पुरत्या स्थलांतरीत होण्याच्या सूचना महानगरपालिकेने दिल्या होत्या अशा ठिकाणांना पुन्हा भेटी देण्यात येत असून तेथील नागरिकांना मनपाच्या तात्पुरत्या संक्रमण शिबिराच्या ठिकाणी राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे आपत्ती काळात मनपा अग्निशमन विभागही सुसज्ज ठेवण्यात आला आहे. महानगरपालिकेचे मुख्य आपत्ती व्यवस्थापन केंद्रासह (संपर्क क्र. ०२५०-२३३४५४६/२३३४५४७ ७०५८९१११२५) तसेच सर्व प्रभाग समिती कार्यालयातील आपत्ती व्यवस्थापन कक्ष २४x७ सुरु असून नागरिकांनी आपत्तीच्या काळात मदतीसाठी याठिकाणी संपर्क साधावा.

अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेच्या सर्व आपत्कालीन यंत्रणा सुसज्ज ठेवण्याचे निर्देश मा.आयुक्त महोदयांनी सर्व विभागांना दिले असून संभाव्य अतिवृष्टीची शक्यता पाहता या कालावधीत महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांनी आवश्यक असेल तरच घराबाहेर पडण्याचे आवाहन मा. आयुक्त श्री. मनोजकुमार सूर्यवंशी यांनी केले आहे.